# विद्वत्तेच्या कविता

-- चं.प्र.देशपांडे

काल मी एक विषय
बराच जाणत होतो --
त्याचे आता काय ?

सगळे सतत डोक्यात
बाळगत फिरू ?

एका निमित्ताने बोललो होतो
त्याचे आता काय ?

-0-0-

मला माहिती
विचारायलाही धजले नाहीत

एवढे तर आम्हालाही
माहिती आहे म्हणाले

बरे, काय झाले त्या
माहितीमुळे ?

तर उलट मलाच म्हणाले,
गोंधळाची संगती लावून दाखवा !

-0-0-

मीही मते मांडतो, बरे का,
इतर मते काटण्यासाठी

मला माझ्याही मतांत
इंटरेस्ट नसते

अवाच्या सवा चिंतन करण्यापेक्षा
गोंधळात पाडणे जास्त सर्जक

माझ्या मतांसाठी मरायला
मी काय वेडा आहे ? !

-0-0-

चित्रांची भाषा विसर
प्रश्नांसमोर ये

कुणी पुराणातल्या वा ऐतिहासिक
पळवाटा वापरल्या --
तू तर जिवंत वर्तमान रे, बाबा !
समोरचे जिवंत दु:ख वापर !

तीच पळवाट कर !

-0-0-

मार्क्सिझम समजला की
कम्युनिझम आपोआप समजेल --
पुढे वर्षभर इतर इझम्सही बघू

धर्मांचा तौलनिक अभ्यास,
थोडेफार आधुनिक सायन्स,
भारतातल्या कादंबऱ्या

हेही विषय मनात आहेत ...
उद्यापासून ...

-0-0-

इतके कायदे
इतके विचार

इतकी चिकित्सा
का लागते ?

डावपेचांमुळे अभ्यासाला
खूप वाव मिळतो

काहींना सत्ताही
मिळते ते वेगळेच ...

-0-0-

काहीच पूर्णपणे
कळू शकत नाही
उदाहरणार्थ हिंदुत्ववाद

कमी अपूर्ण आणि जास्त अपूर्ण
एवढाच फरक

मग लगेचच

बोलत का सुटू नये ?

मुळात हे सगळेच अनावश्यक आहे
हे समजत असल्यावर ?

-0-0-

हजारो पुस्तके
बाप रे !

यातले काय काय
न वाचून चालेल ?

बाप रे !
जवळ जवळ सगळेच !

शास्त्र हा काही आपला
प्रांत नाही ! म्हणून तेही ! न !

-0-0-

आपणच आपल्यावरच्या
नियंत्रणासाठी
खूप विचार करतो

त्यामुळे
काहींना
विद्वान होता येते !

-0-0-

त्यांचा अहंगंड
माझा न्यूनगंड
एवढाच फरक होता

विद्वत्तेच्या क्षेत्रातच फक्त

मोकळ्या वेळात
मी खूप कृतिशील

याची कुठेच बातमी नसायची

-0-0-

ते सारखे मला

कुस्तीला
त्यांच्या आखाड्यावर बोलवायचे

आखाडा आणि उकिरडा
हे दोन शब्द
एकमेकांवर आपटत राहायचे

मी जायचोच नाही
याला ते माझी हार समजायचे !

-0-0-

काहींना वाटायचे
मी पंडितबिंडित आहे

उगीचच मी कुणाचे
भ्रम तोडतबिडत नाही

उलट काहींचे भ्रम
टिकवण्यासाठीच मी राबायचो

कंटाळाबिंटाळा यायचा !
त्रागाबिगाही व्हायचा !

तरीही, मुळात शांत वाटायचे !
याला ते आत्मविश्वास समजायचे !

-0-0-

याने बेकारी प्रचंड वाढेल
वेडे !
उलट अत्यंत कमी होईल !

इतकी वर्षे अभ्यास करून
दोघांचे निष्कर्ष इतके विरुध्द !

बरे झाले !
आपला वेळ वाचला !

त्या वेळाचे आपण काय केले
याला काय महत्त्व आहे ? !
-0-0-

दोर बांधलेला दगड
दातांनी उचलणे

तशी विद्वत्ता
मेंदूने उचलणे

नव्वद टक्के अभ्यास
माणसे एकमेकांशी
हलकटपणाच करणार
यावर आधारलेला

मेंदूने, मेंदूसाठी, मेंदूमुळे
आणि मेंदूतच ...

-0-0-

खरे बोला, चोरी करू नका
हे मला माहीत होते
बालपणापासून --
पुढे लक्षात आले --
एका प्रश्नाला शंभर बाजू,
माझ्या कृतीच्या परिणामांच्या शंभर शक्यता
शिवाय साध्याबाबत गोंधळ...

त्या बाळबोध नैतिकतेशी
फारकत घेतल्याशिवाय
आता जगणेच शक्य नव्हते !
मला दांभिकतेत मरायचे नव्हते !

-0-0-

धर्म, विचारसरणी, इत्यादी
फरक असूनही
माणसे
जुगारी, व्यसनी, ढोंगी, खुनी
सगळीकडेच होती

असे उघड करताच
सगळे सोवळे खवळले

मला काय फरक पडतो ?
मी सोवळाही नाही, ओवळाही नाही,
विचारवंत तर नाहीच नाही ...

-0-0-

अनुभवच नाही आला
विचार हे साधन

अपुरे पडायचा

हे ऐकून मी
सर्दच झालो

हजारो विचारांतून
एक सूत्र !
जादूगारच ते ! अप्पलपोटे !

-0-0-

आपण आपल्याच
विचारसरणीच्या
विरुध्द वागलो
हे नंतर कळायचा त्रास
मी टाळतो

मी आधीच
काळजी घेतो
विचारसरणीहीन राहून !

-0-0-

जगातले सगळे
महत्त्वाचे उद्‌गार
वगळणारे विद्वान

त्यांनाच वगळल्याने
मला ओझेच नाही !
ते फक्त वैचारिक !

-0-0-

बुध्दीने उडवलेल्या ठिकऱ्यांतून
निवड करणे
हा एकच पर्याय
समजणारे भुक्कड टीकाकार
माझ्या भाषेतली संस्कृती
पोरकट आणि करंटी करताना
दिसतात

मी जाहीर विरोध करतो
कुणाचेही लक्ष नसले तरी ।

-0-0-

कहर झाला
प्रकाश, संगीत, ओरडा,
गर्दी आणि
आकर्षक वस्तू यांचा

किती ? काय ?

मन मर्यादित
वस्तू अमर्याद !

यांच्या टक्करीत
माजत चाललेला
एकाकीपणा

भौतिक !

-0-0-

आता पुस्तके
व्याख्याने, शिबिरे
टाळूनच

काय ते व्हायला हवे !

असा क्षण हवा
जो
उलथवेल
आत्महत्या

वेळ कमी आहे !

-0-0-

अनेक मार्गांनी जाणारे
विचार असल्यावर
त्यांचे फायदेतोटे न अनुभवता
विश्वासावर निर्णय घेणे
मला अंधश्रध्दा वाटते ...

प्रत्येक वेळी
अनुभव तरी किती, कसा घेणार ?

म्हणूनच मला
गप्प बसण्यात मजा येते ...

-0-0-

गंमत सोडा
पण खरे असे
काहीच नाही ?

सांगणारे तर
खूप आहेत विद्वान
जुने, जाणते

ते तरी फाटलेले,
दुःखी
नसायला हवे होते ...

-0-0-

सुमारे तीस वर्षांपूर्वीच
जे विद्वान होते
त्यांची आज पुन्हा भेट झाली

आता विद्वत्तेवरून त्यांचे
हात सटकत होते
अभ्यासाचे क्षेत्रही बदलले होते

कशाचेही समर्थन होऊ शकते
या साध्या सत्यात गोठून
नंतर त्याची विरळ माती होणे ...

याला गोंधळ म्हणावे
की
शांतता आणि समाधान ?

-0-0-

पुस्तकांची व्यवस्था लावणे
आणि विल्हेवाट लावणे
आता आवश्यक होते
नाहीतर यांतली काही
महत्त्वाची दुर्मीळ पुस्तके
व्हाया रद्दी पुढे कधीतरी
कुणाला तरी सापडतील आणि
तो आनंदेल...
... वयामुळे कंटाळाही येतोय ...

-0-0-

पाण्यात भिजलेली

हजारो पुस्तके
कष्टपूर्वक वाळवली
बरीचशी वाचली
म्हणजे बचावली

याच पुस्तकांना
वाचण्याच्या निमित्तानेही
पूर्वी
माणसांचे स्पर्श होत असत...
ती माणसे आधी गेली मातीत ! ...

-0-0-

पुस्तकांतून समजलेले
मेंदूत जाणे
मग त्या पुस्तकांची माती होणे

मग त्या मेंदूची माती होणे
त्या आधी जगण्याची
पध्दत थोडी बदलून ...

मग त्या पध्दतीचीही
माती होणे, बरेच जाळले जाणे --
माणूस प्रगतिशील असल्याशिवाय ? ।

-0-0-

कळकट घरात
एवढी वर्षे राहिल्यावर
स्वच्छता सहन होत नाही

भाषा, पुस्तके, विचार
बंद करा बघू -- काय
महत्त्वाचे ते ओळखताच येत नाहीय

भाषाही कितीशी लागेल ?
फार सूक्ष्म, गुंतागुंतीचे असे काहीही
व्यक्त व्हायलाच हवेय ?

-0-0-

कुठलीही चाके
उलटीसुलटी फिरवायचा
प्रश्नच नाही

साधेपणा लागेल,
आवश्यक तेवढेच
विचार लागतील

कोण मेले, कुणाच्या
बातम्या आल्या -- हे तर
फारच ठिसूळ ...

-0-0-

सगळ्यांनी
मुद्याचे बोलणे
म्हणजे चांगले संभाषण

कसे घडावे ?
काहींचे वय हाताबाहेर
काहींचे विचार

अदमासे, अपुऱ्याबरोबरच
अभावावरही
रेटता येतेच ...

-0-0-

अभ्यासतानाचा सूक्ष्मपणा
तसाच स्मृतीत
कसा राहणार ?

ठसे आहेत, त्यावर बोलू,
कुणी आव्हान दिले
तर पाहू

आव्हाने, भांडणे, वाद
यांचाही काळ
संपलेलाच दिसतोय ...

-0-0-

पैसे न मिळवणारे
अप्रस्तुत विद्वान
चूल पेटण्यासाठी
उपकाराची वाट पाहतात

घरचे लोक मळके
जशा भिंती, चादरी, कपडे

विद्वत्तेचे मोल
मूकपणे सहत राहतात...

-0-0-

मूळ संस्कृत शाकुंतल
समजून घेतलेला माणूस
इथे एकलकोंडा
वेड्यासारखा फिरतो

संस्कृत व्याकरण, शांकरभाष्य
आणखी काय काय
पाहून पिझ्झा खात खात
लोक त्याच्याबद्दल बोलतात ...

-0-0-

भाषा टिकावी म्हणून
आटापिटा कोण करणार ?
आयुष्य संपत चाललेली वस्तू
ठिसूळ, विरळ होत जाणारच ...

भौतिक ऐश्वर्यापुढे
भाषिक ऐश्वर्य
भिकारीच म्हणायचे --
भाकडही ! ...

-0-0-

तणावमुक्तीसाठी योग,
झोपेसाठी कविता,
कोठा साफ होण्यासाठी
कथा, कादंबऱ्या

असे मांडता आले पाहिजे --
जगण्यासाठी नशा,
विचारासाठी भावना आणि
मेंदूसाठी xxx !

-0-0-

दुसऱ्याचे ऐकणे
जमेनासे होणे,
बोलण्यापूर्वी
असंख्य गोष्टी डोक्यात येणे --

नेमकेपणा, साधेपणा नष्ट होणे --
एवढे झाले म्हणजे
आपण विद्वान झालो आहोत
हे ओळखावे.

संबंधित सगळे विचार
एका क्षणात एकत्र न येणे !

-0-0-

डोळे अधू झालेयत
वाचवत नाहीय
या दुःखात
पूर्वी वाचलेलेही
नष्ट होतेय

किती नगण्य
एकूण जगातल्या
उपलब्ध मजकूरातले
आपले वाचन ! तेही
वगळून चालणार नाही ?

-0-0-

वर्तमानपत्रे अजूनही
अमाप वाचतो
त्यातले काही काही
संभाषणात आणतो

काहींना माझे त्यामुळे
महत्त्व वाटते
तेही त्यातले काही काही
इथेतिथे वापरतात

गेली पन्नास वर्षे
हा रिचनेस चालू आहे !
मला मात्र सेन्स येतोय
दारिद्र्याचा !

-0-0-

मला काहीच माहीत नसते
अलीकडे हे पाहून
फक्त जुजबी राहिलेत
एकूणच संबंध

याला इंटरेस्टच नाही
कशात तर मग हा
लहान मूलच
म्हणायला हवा

खूप माहिती हाताळणारे
यशस्वी लोक
खूप गडबडीत असतात ...
मी फक्त हसतो ...

-0-0-

चं.प्र.देशपांडे,
३, स्नेहदीप अपा.,
चिंतामणीनगर, सहकारनगर नं. २,
पुणे - ४११००९
**फोन -- २४२२७८४७.**
**२४२२७८४८.**
**मो. ९३७१००५७७३.**